# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय परभणी
## (गृह विभाग)

Email- rdcparbhani@gmail.com Phone No.-02452-223702

जा.क्र.2017/अे-1/पोल/कावी- दिनांक 26/4/2017

27 APR 2017

**विषय :- जनहित याचिका क्र.155/2011**
अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स, इ. संदर्भात
मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत

**"वृत्त विशेष"**

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.155/2011 प्रकरणी दिनांक 31/1/2017 रोजी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत हे नागरी/शहरी क्षेत्र वगळता अन्य क्षेत्रातील अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स इ. संदर्भात करावयाच्या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यात आली आहे. त्यांचा टोल फ्रि नंबर 1077 असा असुन दुरध्वनी क्र.02452-226400 असा आहे. तसेच तक्रार दाखल करण्यासाठी email ID - rdc.parbhani@maharashtra.gov.in असा आहे. त्याचे नोडल अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथील तहसिलदार(सामान्य) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार नागरीकांनी आपल्या तक्रारी दाखल करावे.

तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत जाहिरातीवर प्रतिबंध होण्याच्या दृष्टीकोनातुन आयुक्त, महानगरपालिका परभणी यांचेकडे तक्रारी दाखल करण्यात यावीत. त्यासोबतच संबंधीत नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रातील अनाधिकृत जाहिरातीवर कार्यवाही करण्यासाठीच्या तक्रारी संबंधीत मुख्याधिकारी यांचेकडे दाखल करावेत.

DISTRICT MAGISTRATE
सत्यमेव जयते
PARBHANI

**(पी. शिवा शंकर)**
**जिल्हाधिकारी परभणी**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी,**
**परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, उक्त वृत्त विशेष व्यापक स्वरुपात वर्तमानपत्रातुन प्रसिध्दी देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.**

Scanned by CamScanner